# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❏ पुणे ❏ वर्ष २ रे ❏ अंक १८८ वा ❏ भारतीय सौर दिनांक २० भाद्र. शके १९४८, शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ ❏ पाने ६ ❏ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### भारतीय अंतराळ आणि खगोल विज्ञानातील स्त्री नेतृत्वाचा सुवर्णकाळ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील वाटचाल अत्यंत थक्क करणारी आणि जगासाठी मार्गदर्शक आहे. एकेकाळी सायकलवरून रॉकेटचे सुटे भाग वाहून नेण्यापासून ते थेट मंगळ आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आपले यान यशस्वीपणे उतरवण्यापर्यंतचा भारताचा प्रवास हा जागतिक स्तरावर एका सखोल अभ्यासाचा विषय बनला आहे. या प्रदीर्घ आणि आव्हानात्मक प्रवासात अनेक दशके पुरुषांचे वर्चस्व राहिले असले तरी, आता हे चित्र अत्यंत वेगाने बदलत आहे. या बदलत्या आणि प्रगल्भ पर्वाचा सर्वोच्च बिंदू ऑगस्ट २०२६ मध्ये जगाने अनुभवला, जेव्हा खगोलशास्त्रातील एका सर्वोच्च आंतरराष्ट्रीय मंचावर भारतीय नारीशक्तीचा गौरव करण्यात आला. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्सच्या विद्यमान संचालिका प्रो. अन्नपूर्णी सुब्रमण्यम यांना मिळालेला जागतिक सन्मान हा याच स्थित्यंतराचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा मानला जातो.

कोस्पार विक्रम साराभाई पदक: एका जागतिक सन्मानाची व्याप्ती;

ऑगस्ट २०२६ मध्ये इटली या देशात पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक परिषदेत प्रो. अन्नपूर्णी सुब्रमण्यम यांना कोस्पार विक्रम साराभाई पदक या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कमिटी ऑन स्पेस रिसर्च आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा हा पुरस्कार केवळ उत्कृष्ट संशोधनासाठीच नाही, तर विकसनशील देशांमधून अंतराळ विज्ञानात असामान्य आणि दिशादर्शक योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञांना दिला जातो. भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक आणि द्रष्टे शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई यांच्या अद्वितीय नेतृत्वाला आणि दूरदृष्टीला अभिवादन म्हणून हा पुरस्कार स्थापित करण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे, प्रो. अन्नपूर्णी या हा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या पहिल्याच भारतीय महिला आणि आतापर्यंतच्या केवळ चौथ्या भारतीय वैज्ञानिक ठरल्या आहेत. हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक तपश्चर्येचे फळ नसून, भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्राच्या जागतिक प्रगल्भतेचे आणि वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रभावाचे थेट निदर्शक आहे.

संस्थात्मक नेतृत्व आणि सखोल संशोधनाचा अनोखा संगम:

प्रो. अन्नपूर्णी सुब्रमण्यम यांच्या वैज्ञानिक कारकिर्दीचा आलेख अत्यंत प्रेरणादायी आहे. ताऱ्यांची निर्मिती ), ताऱ्यांचे समूह , आणि आकाशगंगांची गुंतागुंतीची रचना तसेच त्यांची उत्क्रांती यांसारख्या खगोल भौतिकशास्त्रातील अत्यंत क्लिष्ट विषयांवर त्यांनी सखोल संशोधन केले आहे. विशेषतः आपल्या आकाशगंगेच्या शेजारील मॅगेलॅनिक क्लाउड्स यांसारख्या आकाशगंगांच्या संरचनेचा अभ्यास करून त्यांनी ब्रह्मांडाची अनेक नवी आणि अचंबित करणारी रहस्ये उलगडली आहेत. त्या ज्या संस्थेचे नेतृत्व करतात, ती इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स ही संस्था भारतीय खगोलशास्त्राचा कणा मानली जाते. अठराव्या शतकातील मद्रास वेधशाळेपासून सुरू झालेला या संस्थेचा प्रवास आज बंगळुरूतील मुख्यालयापर्यंत आणि लडाखमधील हानले येथे असलेल्या जगातील सर्वात उंचावरील वेधशाळेपर्यंत पोहोचला आहे. भारताच्या पहिल्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आदित्य-१ या सौर मोहिमेत सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेला सर्वात प्रमुख आणि अत्याधुनिक कॅमेरा याच संस्थेने विकसित केला आहे. एका राष्ट्रीय स्तरावरील आणि जागतिक महत्त्व असलेल्या संशोधन संस्थेचे प्रशासकीय नेतृत्व करतानाच स्वतःच्या संशोधनाची जागतिक पातळी अविरतपणे टिकवून ठेवणे, हे प्रो. अन्नपूर्णी यांच्या असामान्य बौद्धिक आणि व्यवस्थापकीय कौशल्याचे जिवंत उदाहरण आहे.

विमेन इन स्टेम : एका प्रगल्भ परंपरेचा विस्तार;

प्रो. अन्नपूर्णी सुब्रमण्यम यांचे हे घवघवीत यश भारतीय विज्ञान क्षेत्रातील इतर महान महिला शास्त्रज्ञांच्या गौरवशाली परंपरेशी घट्टपणे जोडले गेलेले आहे. आज विमेन इन स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) या संकल्पनेला भारतात खऱ्या अर्थाने मूर्त आणि सशक्त रूप प्राप्त होत आहे. भारताची मिसाईल वुमन म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या डॉ. टेसी थॉमस यांनी अग्नी-४ सारख्या प्रगत आणि अत्यंत गुंतागुंतीच्या क्षेपणास्त्र प्रकल्पाचे यशस्वी नेतृत्व करून संरक्षण क्षेत्रात इतिहास रचला. दुसरीकडे, इस्रोच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांमध्ये रितू करिधाल (रॉकेट वुमन) आणि मुथय्या वनिता यांनी अनुक्रमे मंगलयान आणि चंद्रयान-२ मोहिमांच्या अत्यंत कळीच्या आणि जबाबदारीच्या पदांवर काम करून आपली तांत्रिक बुद्धिमत्ता संपूर्ण जगाला दाखवून दिली. केवळ अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातच नाही, तर सूक्ष्मजीवशास्त्र आणि वैद्यकीय क्षेत्रातही डॉ. गगनदीप कांग यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या शास्त्रज्ञांनी रोटाव्हायरस लस विकसित करून लाखो बालकांचे प्राण वाचवले. या सर्व महिला शास्त्रज्ञांनी पारंपरिक सामाजिक बंधने आणि प्रस्थापित चौकटी मोडून काढत भविष्यातील पिढ्यांसाठी एक अत्यंत भक्कम आणि प्रगत पाया रचला आहे.

एक उज्ज्वल आणि आश्वासक भविष्य:


प्रो. अन्नपूर्णी सुब्रमण्यम यांना मिळालेला कोस्पार विक्रम साराभाई पुरस्कार हा भारतीय विज्ञान क्षेत्राच्या प्रगल्भतेचा आणि जागतिक मंचावरील वाढत्या वर्चस्वाचा स्पष्ट आणि निर्विवाद पुरावा आहे. यातून एक गोष्ट ठळकपणे सिद्ध होते की, जेव्हा संस्थात्मक पाठबळ आणि वैयक्तिक जिद्द, अथक परिश्रम आणि प्रखर बुद्धिमत्ता एकत्र येतात, तेव्हा कोणत्याही काचेच्या भिंती सहज पार केल्या जाऊ शकतात. भारतीय महिला वैज्ञानिक आज अंतराळापासून ते सूक्ष्मजीवशास्त्रापर्यंत आणि संरक्षणापासून ते खगोलशास्त्रापर्यंत सर्वच आघाड्यांवर देशाचे केवळ प्रतिनिधित्वच करत नाहीत, तर समर्थपणे नेतृत्व करत आहेत. हे ऐतिहासिक आणि दैदिप्यमान यश देशातील तरुण पिढीसाठी, आणि विशेषतः विज्ञानात आपले करिअर घडवू पाहणाऱ्या हजारो विद्यार्थिनींसाठी एक शाश्वत आणि लखलखीत प्रेरणास्त्रोत राहील. भारतीय विज्ञानाचे भविष्य अत्यंत उज्ज्वल असून, त्याची सूत्रे आता सक्षम, दूरदृष्टी असलेल्या आणि प्रज्ञावान महिलांच्या हाती पूर्णपणे सुरक्षित आहेत, हेच या सर्व ऐतिहासिक घडामोडींतून अधोरेखित होते.

# डॉ. फकीरा राजगुरू यांच्या 'विद्यार्थी घडविताना' पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - काल, म्हणजे बुधवार दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. फकीरा भगवान राजगुरू लिखित 'विद्यार्थी घडविताना मूल्य शिक्षण आणि मूल्य संस्कार! जीवन घडविणाऱ्या मूल्यांचा सुरेख खजिना'या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीसाठी मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारे हे पुस्तक शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना आणि शिक्षकांना उपयुक्त ठरणारे आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन राज्यस्तरीय शिक्षण संजीवनी मासिकाचे संपादक मा. देविदास लिमजे तसेच डॉ. संजय जगताप यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता मराठे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक डॉ. संजय जगताप यांनी केले. त्यांनी शिक्षण आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांतील सर्जनशील कार्याची समाजाच्या जडणघडणीत असलेली भूमिका अधोरेखित केली.




साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त सुप्रसिद्ध लेखक मा. श्री. एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या कार्यवाह स्वाती महाळंक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमास शिक्षणतज्ज्ञ, समुपदेशक आणि लेखिका मा. माधुरी गोखले, ज्येष्ठ लेखक मा. दिलीप गरुड, मा. दिलीप फलटणकर, आंतरराष्ट्रीय मानवअधिकार राज्य संघटनेचे अध्यक्ष मा. भालचंद्र कुलकर्णी, मा. अविनाश सकुंडे, श्रुती कुळकर्णी तसेच प्राचार्य श्याम भुर्के, चंद्रकांत शहासने आणि दीपक जेवणे हे सन्माननीय अतिथी उपस्थित होते. साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

लेखक डॉ. फकीरा भगवान राजगुरू हे फुले-शाहू-आंबेडकर चळवळीच्या अभ्यासातून प्रेरित झालेले आणि शालेय स्तरावर उपक्रमशील शिक्षक म्हणून परिचित आहेत. वर्गातील प्रत्यक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांशी सतत संवाद आणि सामाजिक जाणिवेतून त्यांनी मूल्यशिक्षणाचा विषय हाताळला आहे. आजवर विविध पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांच्या दीर्घ शैक्षणिक अनुभव आणि सामाजिक अभ्यासातून हे पुस्तक आकारास आले आहे.

हे पुस्तक प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य विकासावर भर देते. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ ज्ञान व कौशल्य पुरेसे नाही, तर सत्यनिष्ठा, अहिंसा, करुणा, कर्तव्य आणि देशभक्ती या मूल्यांची नितांत गरज आहे, असे विचार याप्रसंगी ज्येष्ठांनी व्यक्त केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० आणि प्राचीन गुरुकुल परंपरेच्या आधारे मूल्यशिक्षण रुजविल्यास विद्यार्थी केवळ यशस्वी व्यावसायिकच नव्हे, तर जबाबदार व संवेदनशील नागरिक बनतील, असे मत उपस्थितांनी मांडले.

डॉ. संजय जगताप यांनी याप्रसंगी पुस्तक विद्यार्थी आणि शिक्षक सर्वांसाठी वाचण्यायोग्य असल्याचे विशद केले.

मूल्यशिक्षणाचा सुरेख खजिना असलेले हे पुस्तक शाळा, महाविद्यालये आणि पालकांसाठी मार्गदर्शक ठरू शकते, अशी भावना सोहळ्यात व्यक्त झाली. शिक्षण व्यवस्थेत चारित्र्यनिर्मितीला प्राधान्य देण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित करणारा हा कार्यक्रम ठरला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सतीश सातपुते यांनी केले. शेवटी उज्वला जगताप यांनी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.

# ईमोजी नव्हे शब्दच अभिव्यक्तीचे प्रभावी साधन

**ज्योतिर्मय साहित्य**

शब्द हेच परस्पर संवादांचे स्पष्ट माध्यम असतात. प्राचीन काळापासून शब्दा द्वारेच संवाद साधला जायचा. मग तो शब्द अक्षरात्मक असो अथवा अनक्षरात्मक. सर्व जीव, प्राणी आपसात आणि परस्परात शब्द आणि ध्वनी द्वारे भावना व्यक्त करतात. संवादासाठी शब्दाइतके प्रभावी माध्यम जगात अजून तरी सापडलेले नाही. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी ज्याला धन आणि रत्न आणि शस्त्र म्हटले ते शब्दच :

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन जनलोका ।।
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।
शब्देची गौरव पूजा करू ।।

जगद्गुरु संत तुकाराम महाराज प्रत्यक्ष ज्यास धन, रत्न, शस्त्र इतकेच नव्हे तर देवा पर्यंतच्या उपमा देऊन सत्कार करतात तेच शब्द. त्या शब्दांना स्वतःची संपूर्ण अभिव्यक्ती करण्यासाठी वेड्या-वाकड्या मुद्रा, हसरी रडकी गोल चित्र मागेपुढे लावून घ्यायची आवश्यकता नाही असे मला वाटते.

ऋषीमुनींपासून ईश्वरीय ज्ञान आणि वेदज्ञान, शास्त्रज्ञान शब्दांच्याद्वारेच आपल्यापर्यंत पोहोचले संकेताद्वारे नव्हे. आज-काल बदलत्या युगामध्ये संवादाची साधने बदलली त्याचप्रमाणे भाषेमध्येही काही संकेतात्मक चिन्ह व्यक्त झाली आहेत, ज्यांना आपण गोंडस ईमोजी असे म्हणतो. हे हसरे रडके चेंडू शब्दांच्या मागे पुढे खेळताना दिसतात. पण त्यांची शब्दांशी तुलना व्हावी इतकी त्यांची पात्रता नाही असे वाटते.

मोबाईल किंवा त्यातील सुधारणांमुळे जशी व्यवहारांमध्ये सुविधा वाढली तसेच काही त्रुटी सुद्धा निर्माण झाल्या, जवळीक वाढली आणि दुरावा सुद्धा. एका घरात आज





परस्पर संवादाची जागा तो मोबाईल फोन आल्यापासून व्हाट्सअप वगैरे या ॲप म्हणतात त्यांनी घेतली. मग त्यामध्ये हे तात्पुरते विविध भावना व्यक्त करणारे गोल छोटी बोलकी चित्र आली. आणि ज्यामुळे हळूहळू एकमेकांशी खरा संवाद बंद होत आहे, त्याला जबाबदार असलेल्या या मोबाईल आणि ॲप मध्ये या ईमोजी नावाच्या संकेत चित्रांनी शब्दांची स्पर्धा करत अभिव्यक्तीचे माध्यम व्हायला सुरुवात केली. पण खरंच ते इतके सक्षम आहेत का? लोकांनी चक्क यांना अधिक वापरात आणून हे हसरे, रडके, बोलके चित्र टाकायला सुरुवात केली. प्रत्यक्ष भेटायची गरज मोबाईल मुळे बऱ्याचशा प्रमाणात संपुष्टात आली आज-काल समारंभाच्या पत्रिका देखील छापून वाटणे बंद झाले. त्यानिमित्ताने प्रत्यक्ष होणारी भेट या लोकप्रिय ॲपने संपुष्टात आणली. परंतु उरली सुरली संवादाची गरज अँप मध्ये जमा झालेल्या या संकेत चित्रांनी मोडीत काढली.

याबाबतीत काही जणांचे म्हणणे असे येते की वेळेअभावी एखाद्या संदेशावर ईमोजी द्वारा अत्यंत द्रुत गतीने व्यक्त होता येते. याचा अर्थ तेथे शब्दाची जागा ते गोल संकेत चित्र घेतात. आणि तेवढ्यावर भागून जाते. उरली सुरली संवादाची अपेक्षा जी असते ती याप्रकारे भरून जाते. विचार करण्याची गोष्ट ही आहे की त्याने शब्दांची बरोबरी होते का? अर्थात नक्कीच नाही. शब्दांच्या मागे अनमोल, अबोल भावना असतात. प्रत्यक्ष भेट झाली नाही तरी एखादा संदेश दिल्यानंतर त्याला शब्दाद्वारे आलेले उत्तर खूप आपुलकीचे वाटते तितके ते या ईमोजी नावांच्या चित्रांमुळे जवळचे वाटत नाही.

संपूर्ण जग एका मोठ्या गतीने पुढे जात आहे, दररोज नवनवीन शोध आणि गरजा निर्माण होत आहेत. सर्व स्पर्धांमध्ये बरोबरी करत आपला पाय पुढे पडत असताना आलेल्या सुधारणा आणि ते सो कॉल्ड सोफेस्टिकेशन्स याद्वारे सर्वांसारखे पळावे लागत आहे. मग प्रसारमाध्यमांमध्ये ज्याप्रकारे अभिव्यक्ती होत आहे त्यामध्येही स्वतःला समाविष्ट करून घेताना ईमोजी वगैरे या प्रकारे सर्रास अभिव्यक्ती होत आहेत.


© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108

माझ्या लहानपणी मी ऐकत होतो की मुंबई पुण्यामध्ये ड्युटीला जाताना लोक चौकात कोपऱ्यावर गाड्यावर कुठेतरी पटकन वडापाव घेऊन ते खात खात पुढे जातात. ती काळाची गरज होती. आता प्रथा बनली आहे. आज आवडीने फास्ट फूड चा आस्वाद घेतला जात आहे. घरून नाश्ता बनवून द्यायची बला टळली. परंतु विचार करण्याची ही गोष्ट आहे की फास्ट फ ूड हे जेवणाची जागा घेऊ शकत नाही. दिवसभर खाल्लेले वडापाव एका घरगुती थाळीची बरोबरी नाही करू शकत. शेवटी जेवणच करावे लागते. त्याचप्रमाणे हे मूठभर ईमोजी वापरून झालेली अभिव्यक्ती शब्दांची बरोबरी करू शकत नाही.


आज अत्यंत शॉर्टकट, थोडक्यात,आपल्या सुविधेने दुसऱ्याला अल्प अशी दाद देण्याची सर्वोत्तम सोय झालेली आहे ती या ईमोजीद्वारे. कधी कधी घाई गडबडी मध्ये एखाद्या संदेशाला भलते चुकीचे ईमोजी जातात आणि समोर गैरसमज होतात. समोरून आलेली नाराजी मात्र नंतर शब्दाद्वारेच निस्तारावी लागते.

संवादातील अभिव्यक्ती मध्ये उतरणारे हे ईमोजी मात्र तांत्रिक आहेत, तर प्रत्यक्ष शब्द हे सोबत भावना घेऊन आलेले आलेले असतात. एका ईमोजीद्वारे अल्प अभिप्राय देताना मात्र टचस्क्रीन मध्ये आलेला असतो तर शब्दाने व्यक्त होताना त्यातल्या स्पष्ट भावना कळतात आणि पोहोचतात सुद्धा. म्हणून शब्द हे काळजापासून निघालेले श्वासासोबतचे हुंकार भावनेला घेऊन दुसऱ्याच्या काळजाला भिडत असतात. आणि अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम तेच आपुलकीचे शब्द सर्वांनी अंगीकारावे असे माझे मत आहे. शब्दांपेक्षा त्या हसऱ्या, लाडक्या, रडक्या वेड्या,वाकड्या गोल चित्रांना अधिक महत्त्व देऊ नये. अखेर समृद्ध भाषेचे रत्न, अलंकारा समान शब्द भांडार आपल्याकडे असताना, अमृताशी पैजा जिंकणारी भाषा आपल्या मुखात शब्दांच्याद्वारे असताना जर आपण अत्यंत तुटक्या, फुटक्या, तोकड्या, निकृष्ट पद्धतीने अपेक्षिताला अभिप्राय देत असू तर ही बुद्धीची भावनिक दिवाळखोरीच म्हणावी लागेल. म्हणून शब्दानेच संवाद साधा. आणि शब्दाद्वारेच व्यक्त व्हा.

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे


**ज्योतिर्मय साहित्य**

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे,



ब्राह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



# जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
इथे चालला व्यापार
लोक झाले पैसेवाले
शेतकऱ्यांच्या जीवावर ||८३८||


अरे बरस पावसा
तुह कातड गेंड्याच
कस दिसना झाल?
पाणी बापाच्या डोळ्याच ||८३९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७२

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ श्रीरामस्तुती करताना म्हणतात,'' संसारसंगे बहू शीणलों मी, कृपा करी रे रघुराज स्वामी.'' संसार हा आपला महाशत्रू आहे हे लक्षात घेऊन वागणाऱ्याला संसार बाधत नाही. तो संसारात असतो पण साक्षीभावाने प्रपंचाकडे पाहतो. हे सगळे प्रारब्धाचे खेळ आहेत हे तो जाणून असतो. सर्वसामान्यांना तो संसारात रमलेला दिसेलही पण त्याचे चित्त भगवंताकडे असते. आपण बसने किंवा रेल्वेने प्रवास करीत असतो. काहीवेळा सोबत असलेल्या सहप्रवाशांशी आपल्या छान गप्पा होतात. पण आपले स्टेशन आले की आपल्याला उतरावे लागणार हे आपण जाणून असतो. त्यामुळे त्या सहप्रवाशाना सोडून जाताना विशेष दुःख होत नाही. असेच आपण संसारातही असावे. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त असणाऱ्या कमलदलांप्रमाणे ! हे सगळे सांगणे सोपे पण आचरणे कठीण आहे. पण रामनाम घ्यायला तर सुरुवात करू या. तेव्हा हे मना, अधिक वेळ दवडू नकोस. प्रभात समयापासून भगवंताचे चिंतन कर असेच समर्थ आपल्याला या श्लोकातून सांगू इच्छितात.




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२



स्वसंवाद : १. ज्या ऐहिक सुखांसाठी आणि पैशासाठी मी रात्रं-दिवस देह झिजवतो, ते सुख मला कधी चिरंतन शांतता देऊ शकेल का?

२. नामस्मरणासाठी पैशांचा खर्च नाही आणि देहाला कष्टही नाहीत, तरीही मी ते टाळण्यासाठी वेळेचे किंवा थकव्याचे निमित्त शोधतो का?

३. संसारातील नाती आणि कर्तव्यांमध्ये मी इतका गुरफटलो आहे का, की मला या सगळ्याकडे साक्षीभावाने किंवा अलिप्तपणे पाहता येत नाहीये?

४. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त राहणाऱ्या कमळाप्रमाणे, मी संसारात राहूनही माझे चित्त भगवंतचरणी ठेवण्याचा प्रयत्न करतो का?

(क्रमशः)





# || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ प्रत्येक वेळेस यश मिळालेच पाहिजे असे नाही, बऱ्याच वेळेला अपयशातून पण खूप फायदा होतो. म्हणून आपल्या प्रयत्नावर विश्वास ठेवा यश तुमच्याच पायाशी असणार आहे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नाम व विकल्प !

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते. नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## गर्भ उपनिषद

आपल्याला असे जर कोणी म्हणाले की, स्त्रीच्या गर्भातील बाळाचा विकास कोणत्या महिन्यात कितपत होतो, हे फार पूर्वीपासून ऋषी मुनिना माहीत होते तर कदाचित आपणास याचे विशेष वाटणार नाही. कारण आज ते ज्ञान आधुनिक यंत्रांच्या द्वारे सर्वां पर्यंत सहजगत्या आज उपलब्ध आहे. पण जर आपण असा विचार केला की, ही उपनिषदे लिहिली तो काळा किमान 5000 वर्षांपूर्वीच आहे. त्यावेळेस सूक्ष्मदर्शक यंत्रे नव्हती. सोनोग्राफी नव्हती. सिटीस्कॅन नव्हते. तेव्हा मातेच्या पोटातील गर्भाची वाढ कळण्याचे कोणतेच साधन नव्हते. असे असताना, कोणत्याही जिवंत किंवा मृत स्त्रीची चिरफाड न करता, प्रत्येक वेळेची यथायोग्य नोंद या उपनिषदात कशी झाली असेल?

ज्ञानेश्वर महाराजांनीही ज्ञानेश्वरी या ग्रंथात, अर्भकाचा जन्म शुक्र शोणितच्या सांध्यातून होतो असे लिहून ठेवले आहे. स्त्रीच्या गर्भातील शोणित या पेशी केवळ सूक्ष्म दर्शका खालीच दिसू शकतात. पुरुषाच्या वीर्यातील शुक्राणू दिसण्या साठीही केवळ सूक्ष्म दर्शकच लागते. या यंत्राच्या अभावात आपल्या ऋषीमुनींनी हे ज्ञान कसे मिळवले असेल? याचा विचार केल्यावर आपणास आपल्या धर्म ग्रंथाचे महत्त्व पटल्या शिवाय राहत नाही. (क्रमशः)




✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## तरंगाचे प्रश्न दस नंबरी

आयुष्याच्या सुखदुःखाची प्रश्ने/याला ऊत्तरे शोधा बरे एक तणावाचा शिकार, दुसरा आत्महत्या करतो, ज्याला समजावे सेलेब्रिटी, तो एकाकी का मरतो? शिक्षणाने माणूस समृद्ध होतो,आपण आहे भ्रमात अशा ऊच्चशिक्षीताचे माय बाप का वृध्दाश्रमात? काय जालायचे मोठेपनाला, नातं आपुलकीच नाही, जे नाव कमावलंनावगाव, त्यांना सुख का मिळत नाही? रागीट व्यसनी नवरा, त्याला गरिबीची जोड, तरिही त्याची पत्नी बिचारी का करते तडजोड? ऊशीला दगड घेऊन, भर ऊन्हातही झोपतो, काळ्या मातीत घाम गालणारा, कधी झोपेची गोली घेतो? एकत्रित कुटुंब आज कुणाला हव, कामाशिवाय वाटतं का, कुणाच्या घरी जावं? आज घरोघरी ह्या, सुखदुःखाचा मॅप, कुणाचं कुणासी पटेना, म्हणे जनरेशन गॅप? आभासी दुनियेची चाले, कोरडी कोरडी खुशाली, मोबाईलवर सार्या शुभेच्छा व का श्रद्धांजली? मुलांना पाकिटमनी बाईक व दिली जरी कार, छान झाले असते, का शिकवले नाही संस्कार? कठीण परिस्थितीत जपणूक करावी तत्वाची, म्हणूनच गरज वाटते सुखदुःखाचे तरंगाची? गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो.



# जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य

कोथिंबीरमध्ये नैसर्गिक क्लोरोफिल आणि सुगंधी तेले असतात, जे तोंडातील दुर्गंधी निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. तसेच, कोथिंबीरमधील पाचक घटक अन्नातील जड घटक तोडण्यास मदत करतात आणि पोटातील जळजळ कमी करतात.

कधी सेवन करावे :

दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणानंतर लगेच.

कसे करावे : कोथिंबीरची ५-६ ताजी पाने स्वच्छ धुवून व्यवस्थित चावून खावीत.

हिरव्या कोथिंबीरच्या काड्यांसह खाल्ल्यास जास्त फायबर मिळते.

किती वेळा : मुखशुद्धी आणि पचनासाठी प्रत्येक जेवणानंतर खावी.

फायदे : तोंडाची दुर्गंधी दूर: श्वासाला ताजेपणा येतो.

पित्तशामक: छातीतील जळजळ आणि ऍसिडिटी कमी होते.

कोलेस्टेरॉल नियंत्रण: रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल संतुलित राहते.

खास टिप : कोथिंबीर चावून खाल्ल्याने हिरड्यांमधून रक्त येण्याचा त्रासही कमी होतो.

पालेभाज्या

अळू : अळू ही पालेभाजी शरीरास अत्यावश्यक असणारे रक्त वाढवणारी, ताकद वाढवणारी व मलप्रवृत्तीस आळा घालणारी आहे. बाळंतिणीस दूध कमी येत असल्यास अळूची भाजी भरपूर खावी. भाजीकरिता पाने व देठ दोन्हींचा उपयोग करावा. अळूच्या पानांचा रस व जिरेपूड असे मिश्रण पित्तावर उत्तम गुण देते. फुरसे किंवा अन्य विषारी प्राणी चावले असताना वेदना कमी करण्याकरिता अळूची पाने वाटून त्यांचा चौथा थापावा व पोटात रस घ्यावा. गळवे किंवा फोड फुटण्याकरिता अळूची देठे वाटून त्या जागी बांधावी. गळू फ ुटतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

अंबाडी : अंबाडी ही पालेभाजी रुचकर आहे; पण डोळ्य़ाचे विकार, त्वचारोग, रक्ताचे विकार असणाऱ्यांनी वापरू नये. अंबाडी खूप उष्ण आहे, तशीच ती कफही वाढवते.

करडई: करडई पालेभाजी खूप उष्ण आहे. चरबी वाढू नये म्हणून याच्या तेलाचा उपयोग होतो. तसेच याची पालेभाजी वजन वाढू देत नाही. कफ प्रकृतीच्या लठ्ठ व्यक्तींना करडईची भाजी फार उपयुक्त आहे. या पालेभाज्यांच्या रसाने एक वेळ लघवी साफ होते. मात्र डोळय़ाच्या व त्वचेच्या विकारात करडई वापरू नये. करडईच्या बियांच्या तेलाची प्रसिद्धी सफोला या ब्रॅण्डनावामुळे झाली आहे. त्यात तुलनेने उष्मांक कमी असतात.

कुरडू : कुरडूच्या बिया मूतखडा विकारात उपयुक्त आहेत. कुरडूची पालेभाजीसुद्धा लघवी साफ करायला उपयोगी आहे. या पालेभाजीमुळे कफ कमी होतो. जुनाट विकारात कुरडूच्या पालेभाजीचा रस प्यावा. कोवळय़ा पानांचा रस किंवा जून पाने शिजवून त्याची भाजी खावी. दमेकरी जुनाट खोकला, वृद्ध माणसांचा कफविकार यात उपयुक्त आहे.

कोथिंबीर :

कोथिंबीर जास्त करून वापर खाद्यपदार्थांची चव वाढवायला म्हणून प्रामुख्याने केला जातो. चटणी, कोशिंबीर, खिचडी, पुलाव, भात, विविध भाज्या, आमटी, सूप या सर्वांकरिता कोथिंबीर हवीच. **(क्रमशः)**

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

## पोळा

आला पहा सर्जाराजाचा
सण खरा खास
साजरा करुया पोळा
झूल अंगावर चढवू
नंदीस छान सजवून
होऊ आनंदाने गोळा

आला पोळा सण
सर्जाराजास सजवू सारे
करु औक्षण नंदीचे
पुरण पोळीचा नेवैद्द
मुखी त्याच्या घालून
क्षण जपूया आनंदाचे

# दि बॉम्बे आर्ट सोसायटी निवडणूक 2026

## 2026 निवडणुकीच्या निमित्ताने खंत व पर्याय

**दि बॉम्बे आर्ट सोसायटी, मुख्य कार्यालय, ब्रान्दा, मुंबई, महाराष्ट्र (भारत)**




### संकल्प पॅनल-2026

1. प्रा. विजय राऊत (अध्यक्ष) अमरावती
2. डॉ. गजानन सिताराम शेपाळ (सचिव) प. महाराष्ट्र
3. श्रीमती भावना सोनवणे (खजिनदार) सोलापूर / प. महाराष्ट्र
4. श्री. विठ्ठलराव बी. लोखंडकर (सदस्य)- मुंबई
5. प्रा. नंदकिशोर मानकर (सदस्य) नागपूर
6. श्री. अश्विन कदम (सदस्य)- पुणे
7. प्रा. संजय साबळे (सदस्य)- नाशिक
8. प्रा. दिपक रमेश पाटील (सदस्य) खोपोली कोकण / खानदेश
9. डॉ. मिनल राजुरकर (सदस्य) नवी मुंबई
10. प्रा. रमेश भोसले (सदस्य)- पुणे

आम्ही वरील सर्व उमेदवार म्हणजे 4500 मतदारांचे प्रत्यक्ष प्रतिनिधीच आहोत. आपले मत "अनियमिततेला नियमित करून कायद्याच्या चौकटीत बद्ध करुन आपल्या प्रत्येक दृश्य कलाकाराचे हक्काचा "कलामंच" बनविण्यासाठी बांधिल आहोत. म्हणूनच आपले अधिकाधिक मतदान आम्हाला व्हावे यासाठी हे नम्र आवाहन.

सर्व सृजनशील मतदार बंधु-भगिनी
सविनय नमस्कार,

'दि बॉम्बे आर्ट सोसायटी' या 1888 साली स्थापन झालेल्या कला संस्थेच्या विद्यमान पदाधिकारी मंडळाने दि. 3 ऑक्टोबर 2026 ला, 'निवडणुक नियोजन' जाहीर केलेले आहे. सदर विद्यमान पदाधिकारी सुमारे 15 वर्षांपासून " दि बॉम्बे आर्ट सोसायटी"च्या पदाधिकारी समिती सदस्यांच्या पदनामांनुसार 'पदावर' आहेत.

2026 या वर्षात 138 वे वर्ष पूर्ण केलेल्या या संस्थेने, अनेक स्थित्यंतरे, अडी-अडचणी, चढ-उतार आणि बरेच कांही कटु सत्य अनुभवलेले आहेत. "सार्वजनिक न्यास" असलेल्या या संस्थेच्या समस्त मतदारांमधील प्रामाणिक, पारदर्शक विचारांचे संस्कार असलेल्या आजीव सदस्यांनी, संस्थेचे "पुनरुज्जीवन" करण्याचा संकल्प केलेला आहे. हा 'संकल्प' आपल्यांतील प्रत्येक सजग कलाकाराच्या कला प्रज्ञेला उर्जा देण्याच्या इराद्याने, प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी 3 ऑक्टोबर 2026 ला जाहीर केलेल्या निवडणुक रिंगणात उभा आहे.

मुळात 3 ऑक्टोबर 2026 ही निवडणुकीची तारिख जाहीर केल्याचे फार कमी सदस्यांना ज्ञात आहे किंवा सदर निवडणूक जाहीर केल्याचे उशीरा समजले आहे. आपण, सर्व मतदार, मुंबई आणि मुंबई बाहेर महाराष्ट्र तसेच महाराष्ट्रा बाहेरही विखुरलेले असल्यामुळे आपणांस हे माहिती देण्याचे निवेदन पत्रक पोस्टाने वा नोंदणीकृत कुरीयर सेवेने पाठवित आहोत.

आपण सर्व संवेदनशील आणि जागरुक मतदार असलेने आणि 'संकल्प' पॅनेल मधील प्रत्येक 'उमेदवार' हा आपल्यातीलच एक आणि विशेष म्हणजे संवेदनशील, जागरुक आणि प्रामाणिक दृश्यकलाकार असलेने, विद्यमान आणि 15 वर्षांपासून कार्यरत (?) पदाधिका-यांच्या विरोधात का निवडणुक लढवित आहोत? याचे तपशीलवार परंतु मोजक्या मुद्यांच्या आधारे हे जाहीर निवेदन करीत आहोत...!! आपण मतदान करण्यास मुंबईत येवून आम्हांस मतदान करुन संस्थेचे जणु पुनरुज्जीवन करण्याची संधी देऊन प्रोत्साहन द्यावे अशी विनंती करित आहोत.

गतवर्षी 10 ऑगस्ट 2025 ला विद्यमान कमिटीतील दि बॉम्बे आर्ट सोसायटीचे मा. सचिव ज्येष्ठ शिल्पकार चंद्रजित यादव यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. (आजही सार्वजनिक न्यास असलेल्या सदर सोसायटीच्या जबाबदार पदाधिकारी मंडळींनी "नोडल ऑफिसर" म्हणून नोंद असलेल्या शिल्पकार कै. यादव यांचे नाव अद्याप बदललेले नाही, जे आजही सदर संस्थेच्या नावाने असलेल्या लिंक वर दिसते) त्यांच्या दुःखद निधनाचे वेळी आत्मियतेने हजर असलेल्या प्रा. विजय राऊत आणि श्री. विठ्ठलराव लोखंडकर हे आपल्या "संकल्प पॅनेलचे" जबाबदार ज्येष्ठ सदस्य सक्रीय मदतीला धावले होते. अशा कठीण परिस्थितीत आपल्या संस्थेच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि मानसिक बळ देणं फार आवश्यक असतं. हे काम आपल्या संकल्प पॅनेल च्या जबाबदार, नितीमान आणि मदतीला धावून जातांना कुठलाही स्वार्थी वा अभद्र हेतु न ठेवणारे उमेदवारच करु शकतात.

अशा सहृदय, संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकीचा संकल्प पॅनेल आपण भरघोस मतांनी निवडून द्यावा असे आवाहन आम्ही करीत आहोत. मागील 15 वर्षात जर दि बॉम्बे आर्ट सोसायटीच्या कारभाराकडे डोकावून बघीतले तर 2002 पर्यंत मध्ये ही संस्था जहांगीर आर्ट गॅलरीच्या एका छोट्याशा खोलीत बंदिस्त होती. श्री विजय राऊत यांच्या नेतृत्वाखालील नविन दमाच्या पॅनल ला 2002 साली यश मिळाले आणि ते या संस्थेवर आले होते. पुढे 2010 पर्यंत या पॅनल मधील लोकांनी या संख्येचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला. म्हाडा ने काढून घेतलेला प्लॉट आमच्या नेतृत्वात परत आणण्या पासुन ते बांद्रा येथील कलासंकुलाचे काम, लाइफ टाईम अॅवॉर्डसह इतरही महत्त्वाच्या अॅवॉर्ड्स ची संख्या या सोसायटीच्या वार्षिक कला प्रदर्शनाच्या समारंभाच्या वेळी प्रदान करण्यास सुरुवात केली. परंतु 2010 नंतर निवडून आलेल्या लोकांनी 2010 से 2026 म्हणजे तब्बल 15 वर्षे या सोसायटीवर कार्यरत राहुनही कांहीही काम केले नाही. काही हौशी कलाकारांची मेंबरशीप्स वगळली तर व्यावसायिक कलाकारांना साधी मेंबर्स ची परिपूर्ण यादी देखील बनवता आलेली नाही. वार्षिक प्रदर्शना शिवाय यांनी इतर कुठलाही उपक्रम राबवला नाही वार्षिक सभेमध्ये घेतलेल्या कुठल्याही निर्णयांची अंमलबजावणी 15 वर्षात सध्याच्या पदाधिकारी मंडळींनी केलेली नाही. संस्थेचा बिल्डर सोबत झालेल्या जागेच्या व्यहाराचा गोंधळ अजुनही सोडविण्यात आलेला नसल्यामुळे संस्थेला इतर महत्वाच्या कला अॅक्टीव्हीटी करता येत नाहीत. संस्थेकडे आर्थिक प्रायोजकांचे देणगी मिळवण्यासाठीचे उपाय यांच्या गोंधळामुळे उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे संस्थेवर छोटे छोटे छंद वर्ग चालू करून खर्च भागवण्यासाठी प्रयत्न करायची वेळ आली आहे. 1888 साली ज्या उद्देशाने ही संस्था स्थापन झालेली होती आणि भारतीय इतिहासात संख्येचे नाव मोठ्या आदराने घेतले जात होते त्या प्रतिष्ठेला 15 वर्षात अधोगतीला पोहोचवले गेले.

आज ही संख्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी कला संस्था म्हणून उद्यास आणून भारतीय संस्कृतीचा "आयकॉन" बनवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. अगदी 15 वर्षाची वस्तुस्थिती पाहण्या अगोदर 2017 पासून मा.धर्मादाय आयुक्त, वरळी, मुंबई यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या विद्यमान पदाधिकारी मंडळींनी सादर केलेल्या दस्त ऐवजा नुसार जी माहिती पुढे आली त्या माहितीच्या आधारे आम्ही खालील मुद्दे अत्यंत खेदाने आपणांसमोर मांडत आहोत. सदर मुद्यांची कदाचित विद्यमान मंडळीमधील कांही पदाधिकार्यांना कल्पनाही नसेल असे वाटते. ते मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

दि बॉम्बे आर्ट सोसायटी, मुंबई
ऑडिट पॉईंट्स

1) Latest Audit Report submitted only 2017-2018 by CA Hemang Shah. Audit Report not submitted to Charity Office from 2018-19 to 2025-26 म्हणजे, 2018 पासून 2026 पर्यंत आजतागायत संस्थेचा कोणताही हिशोब केला नाही, त्याचे सीए कडून ऑडिट केले गेलेले नाही आणि ते चॅरिटी ऑफिसमध्ये ऑफलाईन किंवा ऑनलाईन सादर केले गेले नाही.

2) प्रत्येक वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात चॅरिटी ऑफिसला नियम 16 (अ) नुसार अंदाजित जमा व खर्चाची बजेटची कॉपी चॅरिटी ऑफिसमध्ये जमा करायची असते. ती देखील 2026 पर्यंत जमा केलेली नाही,

3) 2018 च्या बॅलन्सशीटनुसार 1.5 कोटी corpus fund तसेच रिझर्व्ह फंड रुपये 29,21,423/- आणि इतर फंड रुपये 24,93,250/- संस्थेकडे जमा होता. म्हणजे जवळ जवळ 2 कोटी रुपये होते. त्यात नंतर जमा किंवा खर्च होऊन आता 2026 रोजी किती corpus व रिझर्व्ह fund संस्थेकडे शिल्लक आहे? याची कोणतीही माहिती नाही. हा संस्थेचा राखीव फंड असतो, त्यातूनही खर्च झाल्याचे दिसते.

4) 2018 च्या बॅलन्सशीटनुसार रुपये 65,874/- advances दाखवले आहेत. ते कोणत्या ट्रस्टीने व कधी घेतले. त्यांची नावे जाहिर झाली पाहिजे. त्यामध्ये 2026 पर्यंत किती लोकांनी संस्थेमधून अॅडव्हान्स उचल घेतली आहे व कोणत्या नियमाप्रमाणे. त्याची सर्व माहिती कार्यरत ट्रस्टींनी दिली पाहिजे. अॅडव्हान्सचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. एकूण अॅडव्हान्सच्या रकमेपैकी किती अॅडव्हान्सेस पुनःश्च संस्थेकडे जमा झाले आहेत. जमा न झालेल्या अॅडव्हान्सवर व्याज लावून त्यांच्याकडून वसुलीची कार्यवाही, संस्थेकडून नोटीसा बजावणे अशी कार्यवाही झाली आहे का? या बद्दल माहिती नाही.

5) SBI overdraft against FD 40 लाख घेतल्याचे दिसून येते. ते कशासाठी घेण्यात आलेले आहे ? अथवा कशासाठी खर्च झाले आहे? त्याचा कोणताही हिशोब नाही. एफडीवर घेण्यात आलेले हे 40 लाख पुन्हा जमा करण्यात आले आहे का? याचीही नोंद दिसत नाही.

6) 2018 च्या बॅलन्सशीट नुसार रुपये 1,74,92,882/- investments आहेत, त्याचा कोणताही तपशील नाही, ते कुठे गुंतवले गेले आहेत ? की 2026 पर्यंत पूर्ण खर्च झालेले आहेत, त्याचा हिशोब नाही.

7) संस्थेच्या सन 2018 पर्यंत रुपये 13,26,096/- च्या एफडी होत्या, त्याची 2026 रोजीची सद्यस्थिती काय आहे ? याची माहिती द्यायला हवी.

8) रुपये 17,04,526/- चे डोनेशन 2018 साली मिळाले होते, त्यानंतर प्रत्येक वर्षी लाखो रुपये डोनेशन मिळते, त्याचा हिशोब नाही. त्याचे ऑडिट नाही, चॅरिटी ऑफीसमध्ये ऑडिट रिपोर्ट सबमिट केले गेले नाही. 9) 2018 च्या ऑडिट रिपोर्ट नुसार रुपये 14,73,145/- other expenses दाखवले आहेत. इतर किरकोळ खर्च जवळ जवळ 15 लाख करण्यात आलेला आहे. तो कशासाठी करण्यात आलेला आहे ?

10) 2026 पर्यंत संस्थेची किती बँक खाती आहेत ? आणि त्यातील शिल्लक रक्कम किती आहे ? याचा ऑडिट रिपोर्टमध्ये कोणताही उल्लेख नाही. रुपये 37,30,815/- income as on balance 31.03.2018 आहे. मात्र खर्च रुपये 46,32,620/- झालेला आहे. हे संशय निर्माण करणारे आहे.

11) हे सर्व 2018 पर्यंतचे आहे. ते पण कितपत खरे आहे, माहिती नाही. कारण त्याआधीचे व नंतरचेही ऑडिट रिपोर्ट उपलब्ध नाहीत. मात्र त्यानंतर 8 वर्षे अनागोंदी व अनियमित व्यवहार झाल्याचे दिसून येते. पारदर्शक व्यवहार नसल्याने, त्याचे कोणत्याही सीए कडून ऑडिट झाले नाही. आणि ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयास ऑफलाईन व ऑनलाईन सादर केले गेले नाहीत. अशी माहिती प्राप्त झालेली आहे.

12) या शिवाय आणखी बर्याच अनियमितता दर्शवणार्या पुराव्यांची श्रृंखला आहे.

सन्माननीय मतदारांना म्हणूनच आम्ही, संकल्प पॅनेल चे उमेदवार विनम्रपणे आवाहन करीत आहोत...!! आपण सर्वांनी आपल्या बॉम्बे आर्ट सोसायटी ला बळ देण्यासाठी आणि 1888 साली जन्म झालेल्या या 138 वर्षांच्या सार्वजनिक न्यास असलेल्या कलासंस्थेला नवसंजीवनी बहाल करण्यासाठी दि.3 ऑक्टोबर 2026 रोजी "संकल्प पॅनेल" ला मतदान करून ऊर्जा द्यावी.

### "संकल्प पॅनेल" चा "वचननामा"

निवडणूक जाहीरनामा - नवनिर्मितीचा संकल्प

2026 पासून केवळ वार्षिक प्रदर्शन नाही, तर कला आणि कलावंतासाठी ठोस कृती. हाच आमचा संकल्प.

आमची 26 कलमी कृती-योजनाः

1) प्रकाशनः हौशी आणि युवा कलावंतांसाठी नियमित, दर्जेदार कला-प्रकाशने व डिजिटल पोर्टफोलिओ.

2) जनजागृतीः कला सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी शहर-शहरात कला-उत्सव आणि शिबिरे.

3) हक्क आणि चळवळः कला क्षेत्रातील व्यावसायिक, शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांवर अधिकृत भूमिका आणि प्रसंगी आंदोलन.

4) कला संमेलनः साहित्य संमेलनाच्या धर्तीवर देश-विदेशात वार्षिक भव्य कला संमेलन आणि परिसंवाद.

5) शिक्षण सुधारणाः कला शिक्षण पद्धतीतील बदलांबाबत सरकार दरबारी पाठपुरावा आणि जागरूकता.

6) महिला कलावंतः महिला कलावंतांसाठी स्वतंत्र, विशेष प्रदर्शन आणि हक्काचे व्यासपीठ.

7) ज्ञान-संवादः ज्येष्ठ आणि विशेष कलावंतांची प्रात्यक्षिके (Demos) आणि विचारवंतांची व्याख्याने.

8) राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाणः देश-विदेशातील आर्ट गॅलरीजसोबत टाय-अप आणि कलाकार निवासी (Residency) कार्यक्रम.

9) कलावंत कल्याण निधीः नैसर्गिक आपत्ती किंवा वैद्यकीय गरजेच्या वेळी गरीब व गरजू कलावंतांना तातडीची आर्थिक मदत.

10) पुरस्कार आणि शिष्यवृत्तीः कलावंत आणि कला-विद्यार्थ्यांसाठी पुरस्कारांची संख्या आणि शिष्यवृत्तींमध्ये भरीव वाढ.

11) ऑडिट न झालेल्या सर्व वर्षाचे नियमाप्रमाणे सर्टिफाइड सीए कडून ऑडिट करून घेण्यात येईल व पारदर्शकरित्या सर्वांसमोर ठेवण्यात येईल. प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालय व आयकर कार्यालय यांना सादर करून पारदर्शक व्यवहार करण्यात येईल.

13) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 16 अ नुसार प्रतिवर्षी बजेट धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना सादर करण्यात येईल.

14) अनियमिततेसाठी जबाबदार व्यक्तीवर नियमाप्रमाणे धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना कारवाई करण्याबाबत व वसुली करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येईल

15) corpus fund, reserve fund तसेच ट्रस्टचा इतर निधी CSR FUND इ. योग्य व विहित मार्गाने जास्तीत जास्त प्रमाणात वाढून trust deed मधील object नुसार त्याचा कला व कलाकारांच्या हितासाठी वापर करण्यात येईल.

16) trust चे infrastructure कसे सुयोग्य व नियोजन पद्धतीने वाढेल हे केले जाईल.

17) कला व कलाकारांच्या उत्तम प्रचार आणि प्रसारासाठी सर्वसमावेशक फिजिकल व डिजिटल प्रसिद्धी साहित्य निर्माण केले जाईल, त्यासाठी प्रगत तंत्रज्ञानावर आधारित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येईल.

18) सर्व सभासदांचे डिजिटल ID करता येईल. सर्व सभासदांचे 05 वर्षातून एखादे चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येईल.

19) दि बॉम्बे आर्ट सोसायटी आर्ट फेस्टिवल सुरु करण्याची प्रथा निर्माण केली जाईल.

20) चित्रकारास चित्र प्रदर्शन भरविण्यास शासनाकडून अनुदान मिळण्याकरिता प्रयत्न करणार आहोत.

21) जेष्ठ दृश्य कलाकारांना शासना मार्फत पेन्शन सुविधा मिळण्या करिता प्रयत्न करणार आहोत शिवाय प्रयोगशील आणि गरजू दृश्य कलाकारांना आर्थिक मदत कशा प्रकारे करता येईल... यावर सकारात्मक प्रयत्न आपण करणार आहोत.

22) Art Collectors लिस्ट अपडेट करणे.

23) भविष्यात स्टुडीओ रेसिडंसी फॅसिलिटी च्या दृष्टीने सकारात्मक विचार करणे आणि भविष्यात NGMA प्रमाणे ठराविक कलाकारांचे रिट्रोस्पेक्टीव जेणेकरून लांबून कलाकार व कलाप्रेमी भेट देतील.

24) प्रसिद्धी आणि जनसंपर्क या स्वतंत्र विभागाची निर्मिती करून संस्थेच्या आणि प्रदर्शकांच्या उपक्रमांची माहिती आधुनिक प्रसिद्धी माध्यमे तसेच पारंपरिक प्रसिद्धी माध्यमे याद्वारे कला रसिकांपर्यंत पोहोचवली जाईल.

25) संस्थेचे अद्ययावत ग्रंथालय, कला संग्रहालय, आणि प्रतिथयश कलाकारांसह दुर्मिळ कलाकृतींच्या लिलावाचे आयोजन करणे. (काही सेवा-शर्ती-नियम-अटींच्या अधीन राहून)

26) त्रिमितीय शिल्पाकृती भासणार्या बॉम्बे आर्ट सोसायटीच्या इमारतीच्या अवतीभवती सौंदर्गीकरण करणे आणि अभ्यागतांसाठी, कला रसिकांसाठी, जे या परिसराला भेटी देणार आहेत त्यांच्यासाठी एक उत्कृष्ट, दर्जा असलेले उपहारगृह सुरु करणार आहोत.

असा 26 कलमी कार्यक्रम "संकल्प पॅनेल" द्वारे अंमलात आणण्यासाठी आम्ही वचनबद्ध राहणार आहोत.

या शिवाय ऐनवेळी येणाऱ्या सकारात्मक आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा प्राधान्याने विचार केला जाईल.

**आमची वास्तू आता सज्ज आहे. आता कृतीची वेळ आहे. कलावंतांनो, एकत्र येऊया! नवनिर्मितीचा संकल्प करूया...!!**

|| प्रकाशन, उत्सव, कला संमेलन शिक्षण सुधारणा, महिला कलावंतांना मान राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण, कलावंत कल्याण पुरस्कार, शिष्यवृत्ती हाच आमचा संकल्प ||!

***

आम्ही नम्रपणे आपल्या ध्यानात आणून देऊ इच्छितो की, आम्ही व्यक्तीगत स्वरुपात कुणाचीही बदनामी करीत नसून, सध्या कार्यरत असलेल्या "द बॉम्बे आर्ट सोसायटी" च्या पदाधिकारी विश्वस्तांनी मा.धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात नियमानुसार ज्या ज्या कायदेशीर व नियमानुसार पूर्तता करणे आवश्यक आहे, त्या बाबतीत आम्हाला जी अनियमितता आढळून येते आहे, त्याचे खंडन त्यांनी अशाच प्रकारे जाहीरपणे केलेत तर आम्हाला आनंदच होईल याची सर्वांना माहिती असावी.


### संकल्प पॅनल-2026


प्रा. विजय राऊत (अध्यक्ष) अमरावती


डॉ. गजानन सिताराम शेपाळ (सचिव) प. महाराष्ट्र


श्रीमती भावना सोनवणे (खजिनदार) सोलापूर / प. महाराष्ट्र


श्री. विठ्ठलराव बी. लोखंडकर (सदस्य)- मुंबई


प्रा. नंदकिशोर मानकर (सदस्य) नागपूर


श्री. अश्विन कदम (सदस्य)- पुणे


प्रा. संजय साबळे (सदस्य)- नाशिक


प्रा. दिपक रमेश पाटील (सदस्य) खोपोली कोकण / खानदेश


डॉ. मिनल राजुरकर (सदस्य) नवी मुंबई


प्रा. रमेश भोसले (सदस्य)- पुणे

ADVT.

# अल्लू अर्जुनच्या चाहत्यांकडून आरोग्य जनजागृतीचा संदेश; सोलापूरमध्ये एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात

## ८ राज्यांमध्ये ८२० कार्यक्रमांच्या माध्यमातून ३ लाखांहून अधिक मुलींपर्यंत पोहोचवला एचपीव्ही लसीकरण जनजागृतीचा संदेश





**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – अल्लू अर्जुन हे खरोखरच अशा महान अभिनेत्यांपैकी एक आहेत, जे बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरण्यासोबतच प्रेक्षकांच्या मनावरही राज्य करतात. त्यांनी स्वतःला एक खरा पॅन–इंडिया सुपरस्टार म्हणून प्रस्थापित केले आहे. देशासोबतच परदेशातही त्यांची जबरदस्त फॅन फॉलोइंग आहे. सुपरस्टार बनल्यानंतर समाजाला काहीतरी परत देण्याच्या त्यांच्या बांधिलकीसाठीही त्यांचे तितकेच कौतुक केले जाते. या अभियाना अंतर्गत त्यांनी आपल्या अल्लू अर्जुन फॅन असोसिएशन (एएएफए) च्या माध्यमातून देशभरातील एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रमांना पाठिंबा दिला आहे, ज्याद्वारे मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचून उल्लेखनीय काम केले जात आहे.

एएएफएची टीम एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रम मोठ्या स्तरावर समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवत आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, ओडिशा आणि अंदमान–निकोबार बेटे अशा आठ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुमारे ८२० कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमांद्वारे ३ लाखांहून अधिक मुलींना एचपीव्ही लसीकरणाबाबत जागरूक करण्यात आले आहे. देशभरातील अनेक लोकांना लाभ देणारा हा खरोखरच एक मोठा आणि महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

एएएफएने महत्त्वाकांक्षी एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रमाची घोषणा केली होती, मात्र आता हा उपक्रम आणखी मोठ्या स्तरावर पोहोचला आहे. या प्रयत्नात सहभागी होत सोलापूर टीमने सोलापूर जिल्ह्यातील निळकंठेश्वर हायस्कूलमध्ये एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे सुरू केला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व, त्याद्वारे होणारे प्रतिबंधात्मक फायदे आणि भावी पिढीला एचपीव्ही –संबंधित आजारांपासून सुरक्षित ठेवण्याबाबत शिक्षित करणे हा होता.

अशा उपक्रमांच्या माध्यमातून एएएफए तळागाळात जनजागृती निर्माण करण्यासोबतच अधिक समृद्ध आणि माहितीपूर्ण भविष्यासाठी योगदान देण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

हा उपक्रम अल्लू अर्जुनच्या चाहत्यांमध्ये असलेल्या जबाबदारीच्या भावनेचे मजबूत उदाहरण आहे. आपल्या सामूहिक पोहोच आणि प्रभावाचा उपयोग करून ते समाजातील महत्त्वाच्या विषयांवर काम करत आहेत. या मोहिमेच्या माध्यमातून असोसिएशनला एचपीव्ही लसीकरणाबाबत योग्य आणि महत्त्वपूर्ण चर्चा घडवून आणायची आहे, तसेच सर्व्हायकल कॅन्सरपासून बचाव करण्याबाबत अधिकाधिक लोकांमध्ये जागरूकता निर्माण करायची आहे.



# श्रीयश प्रतिष्ठानमध्ये तीन दिवसीय इंग्रजी संभाषण कौशल्य कार्यशाळा उत्साहात संपन्न

## उत्कृष्ट संवाद कौशल्यासाठी १० गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – येथील श्रीयश प्रतिष्ठानच्या इंग्रजी संभाषण कौशल्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि प्रभावी इंग्रजी संवाद कौशल्य विकसित करणे या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, फार्मसी इत्यादींच्या एकूण ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या तीन दिवसांच्या कालावधीत वक्तृत्व, गट चर्चा आणि विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून ६१ हून अधिक विद्यार्थ्यांनी इंग्रजी बोलण्याचा सराव केला. इंग्रजी संभाषण कौशल्य विभागप्रमुख प्रा. योगेश पाटील आणि प्रा. डॉ. प्रवीणकुमार जायभाये यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले . या उपक्रमासाठी प्रा. शिवानी शर्मा आणि प्रा. सृष्टी अल्टे यांनी विशेष सहकार्य केले.कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १० गुणवंत वक्त्यांचा विशेष पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोमोडोर मा. सुरेंद्र गोचके यांनी इंग्रजी संभाषणाचे महत्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.या प्रसंगी श्रीयश पॉलीटेक्निकचे प्राचार्य संदीप खंडागळे सर आणि फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मंगेश घोडके सर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणाचे महत्त्व समजावून सांगत पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित केले.या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष इंजिनियर बसवराज मंगरुळे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# बालमनावर मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्य असावे जालन्याच्या बालकुमार संमेलनात डॉ.विनोद सिनकर

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर – वर्तमानातातील परिस्थिती पाहता बालमनावर आपण कोणते संस्कार करीत असतो,याचा गांभिर्याने विचार करायची वेळ आलेली आहे. समाज माध्यमे,मोबाईल सारख्या माध्यमांच्या अविवेकी वापराने समाजमन बदलत आहे. वास्तवात बालमन समृद्ध करणारे आणि मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्यच प्रभावी ठरते, असे प्रतिपादन डॉ.विनोद सिनकर यांनी मांडवा (जि. जालना ) येथे झालेल्या बालकुमार संमेलनात काढले.

पद्मभूषण डॉ.बद्रीनारायण बारवाले विद्यालयात संमेलन पार पडले. स्व. दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिनानिमित्त साने गुरूजी कथामाला आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने संमेलनाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होत. या संमेलनाचे डॉ.विनोद सिनकर अध्यक्ष होत. संमेलनाचे उदघाटन साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार उमेश काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी साने गुरुजी कथामालेचे प्रमुख कार्यवाह आर.आर.जोशी, संस्थाध्यक्ष किसनराव सोलाट, सचिव नंदाताई सोलाट, उपाध्यक्ष ज्ञानदेव चंद,मुख्याध्यापिका अंजली सोलाट, साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुहास सदाव्रते, साहित्य भारती जालना शाखेच्या अध्यक्षा शुभांगी लिंगायत, जगदीश कुडे, जवाहर तुल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्याध्यापिका अंजली सोलाट यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास सदाव्रते यांनी केले. आभार संदीप इंगोले यांनी मानले.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

भूतकाळातून शिका; पण त्यात राहू नका.
भविष्यासाठी तयारी करा; पण त्यात जगायला सुरुवात करू नका.
स्वतःकडे पाहण्याची सुरुवात
आत्मज्ञान म्हणजे कदाचित स्वतःबद्दल आणखी काही नवीन विचार मनात साठवणे नव्हे. तर स्वतःबद्दल आपण निर्माण केलेल्या जुन्या समजुतींकडे पाहणे होय.
टीकेने आपण इतके का दुखावतो?
प्रशंसा मिळाल्यावर आपल्याला इतका आनंद का होतो?
दुसऱ्याचे यश पाहून आपल्या मनात न्यूनतेची भावना का निर्माण होते?
एखाद्या जुन्या व्यक्तीचे किंवा घटनेचे नाव ऐकताच आपल्या मनाची अवस्था का बदलते?
या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वप्रथम पुस्तकांमध्ये जाण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या जीवनाकडे पाहायला हवे.
क्रोध आला—तो पाहा.
मत्सर निर्माण झाला—तो पाहा.
भीती निर्माण झाली—ती पाहा.
एखादी गोष्ट मिळवण्याची अस्वस्थता वाढली—ती पाहा.
प्रत्येक भावनेला ताबडतोब बदलण्याची आवश्यकता नाही.
केवळ तिला पाहायला सुरुवात करणे हीच फार मोठी गोष्ट आहे.
कारण ज्या क्षणी आपण एखाद्या भावनेकडे पाहू लागतो, त्या क्षणी आपण केवळ ती भावना राहत नाही.
आपल्या अंतःकरणात अशी एक जागरूकता असते, जी त्या भावनेकडे पाहत असते.
हीच अंतराची जाणीव हळूहळू समज निर्माण करते.
जागरूकताच प्रकाश आहे
आपल्याला अनेकदा वाटते की आपल्याला एखादा विशेष अनुभव हवा आहे. पण कदाचित विशेष अनुभवापूर्वी आपल्याला स्वच्छ दृष्टी आवश्यक आहे.
जर आपली दृष्टी इच्छा, भय, स्मृती आणि कल्पनांनी झाकलेली असेल, तर कोणताही अनुभव आपल्याला दीर्घकाळ स्पष्टता देऊ शकत नाही.
जागरूकता म्हणजे एखादी गुंतागुंतीची साधना नाही. (क्रमशः)

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### काम आणि कुटुंबाचा समतोल कसा साधावा?

सकाळी घरातून बाहेर पडताना आपण एकच विचार करतो—
"आज खूप काम आहे..." ऑफिसची धावपळ...
बैठका... फोन... टार्गेट... जबाबदाऱ्या...
दिवसभर आपण आपल्या कुटुंबासाठी मेहनत करत असतो. पण कधी कधी संध्याकाळी घरी परतल्यावर एक प्रश्न मनाला टोचून जातो—
"ज्यांच्यासाठी इतकी धावपळ करतोय, त्यांच्यासोबत शेवटचं निवांत कधी बसलो होतो?"
हेच आजच्या आयुष्याचं सर्वांत मोठं वास्तव आहे.
आपण कुटुंबाला सुख देण्यासाठी काम करतो...
पण त्या सुखाच्या शोधात कुटुंबाला वेळ द्यायचाच विसरतो. एक दिवस मुलं मोठी होतात.
त्यांना आपली गरज कमी लागते.
आई-वडिलांच्या हातांवर सुरकुत्या येतात.
त्यांचा आवाज थकतो. जोडीदारही आपल्याशी बोलणं कमी करतो. घर तसंच असतं...
पण घरातला आवाज कमी होत जातो.
आणि एक दिवस आपण विचारतो—
"माझी माणसं माझ्यापासून एवढी दूर कधी झाली?"
उत्तर कदाचित एका दिवसाचं नसतं.
ते प्रत्येक त्या दिवशी तयार झालेलं असतं...
ज्या दिवशी आपण म्हटलं होतं—
"आज नाही... उद्या."
म्हणून काम सोडायचं नाही.
जबाबदाऱ्यांपासून पळायचं नाही.
यशाची स्वप्नंही सोडायची नाहीत.
पण...
वेळेचा समतोल साधायचा आहे.
कारण दिवसात २४ तासच असतात.
पण त्या २४ तासांमध्ये आपली माणसं आयुष्यभर वाट पाहत बसणार नाहीत.
दररोज किमान थोडा वेळ फक्त कुटुंबासाठी ठेवा.
समतोल साधण्यासाठी काही मोठे बदल करण्याची गरज नाही.
दररोज कुटुंबासाठी थोडा 'नो मोबाईल टाइम' ठेवा.
जेवताना सगळे एकत्र बसा.
(क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

आपली संस्कृती परस्त्रीला 'आई' किंवा 'बहीण' मानण्याचे उदात्त संस्कार आपल्याला बालपणापासून देते. पशुपक्ष्यांशी नातं जोडताना सुद्धा आपण ताई आणि दादाचंच नातं जोडतो—चिऊताई, काऊदादा, खारूताई! घरामध्ये मुलगा लहान आणि मुलगी मोठी असेल तर त्या मुलाला 'ताई' म्हणायला शिकवलं जातं; मुलगा मोठा असेल तर त्याला 'दादा' म्हणायला शिकवलं जातं. पश्चिम बंगालमध्ये तर सर्व ज्येष्ठ पुरुषांचा उल्लेख आदराने नावापुढे 'दा' (म्हणजे दादा/भाऊ) आणि स्त्रियांना 'दीदी' (बहीण) म्हणूनच केला जातो.
जिथे रक्ताचे नाते नसते, तिथेही केवळ एका विश्वासाच्या धाग्याने जोडलेली मानलेली बहीण सख्ख्या बहिणीपेक्षाही जास्त माया लावते; आणि भाऊही तिच्या सन्मानासाठी व संरक्षणासाठी ढाल बनून उभा राहतो. अशी कित्येक निस्वार्थ आणि आदर्श उदाहरणे आपल्या आजूबाजूला समाजात दररोज पाहायला मिळतात. मी स्वतःही अशा नात्याचा अनुभव घेत आहे, त्याबद्दल स्वतःला भाग्यवान मानतो; आणि रक्तापलीकडे जाऊन जिने माझ्याशी भावाचं पवित्र नातं जपलं आहे, अशी प्रेमळ बहीण मला दिल्याबद्दल ईश्वराचेही आभार मानतो. (क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# सौ. वैदेही गद्रे लिखित कलाधिपती : एक अभिप्राय


**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृती ही कला, ज्ञान, अध्यात्म आणि जीवनमूल्यांचा समन्वय साधणारी संस्कृती आहे. या संस्कृतीत चौंसष्ट कलांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या कला केवळ मनोरंजन किंवा कौशल्याची साधने नसून व्यक्तिमत्त्व विकास, सौंदर्यदृष्टी, सर्जनशीलता आणि जीवन समृद्ध करणाऱ्या क्षमता आहेत. अशा चौंसष्ट कलांचा रसाळ, ललित आणि वाचकाला भावविश्वात घेऊन जाणारा परिचय करून देणारे सौ. वैदेही गद्रे यांचे कलाधिपती हे पुस्तक मराठी साहित्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण योगदान म्हणावे लागेल.

पुस्तकाच्या शीर्षकातच त्याची मध्यवर्ती संकल्पना दडलेली आहे. भारतीय परंपरेत भगवान श्रीगणेश यांना विद्येचे, बुद्धीचे आणि कलांचे अधिपती मानले जाते. या पारंपरिक श्रद्धेला केंद्रस्थानी ठेवून लेखिकेने चौंसष्ट कलांचा प्रवास उलगडला आहे. त्यामुळे पुस्तकाला धार्मिकतेचा आव आणला गेलेला नसून भारतीय सांस्कृतिक परंपरेचा सन्मान करणारे एक सुंदर अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

पुस्तकाच्या प्रारंभी लेखिकेचे मनोगत आणि त्यानंतरची प्रस्तावना वाचकाला पुस्तकाच्या निर्मितीमागील प्रेरणा, उद्दिष्ट आणि विषयाची व्याप्ती समजावून सांगतात. लेखिकेची भारतीय संस्कृतीबद्दलची आस्था, कलांबद्दलचा जिव्हाळा आणि संशोधनाची वृत्ती या प्रारंभीच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे वाचकाची विषयाशी भावनिक आणि बौद्धिक नाळ जुळते.

या पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची लालित्यपूर्ण शैली. चौंसष्ट कलांसारखा माहितीप्रधान विषय अनेकदा कोरडा किंवा सूचीवजा वाटू शकतो; परंतु लेखिकेने तो अत्यंत सहज, ओघवत्या आणि भावपूर्ण भाषेत मांडला आहे. प्रत्येक कला जणू स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घेऊन वाचकासमोर उभी राहते. माहिती देण्यापुरते मर्यादित न राहता त्या कलेचे सांस्कृतिक, भावनिक आणि




जीवनोपयोगी पैलू लेखिकेने संवेदनशीलतेने उलगडले आहेत.

पुस्तकात योग्य ठिकाणी कविता, अभंग, काव्यपंक्ती आणि साहित्यिक संदर्भ यांचा अत्यंत समर्पक वापर करण्यात आला आहे. त्यामुळे गद्य आणि पद्य यांचा सुंदर संगम साधला गेला आहे.

वाचकाला माहिती मिळतेच; परंतु त्याचबरोबर साहित्यिक आनंदही अनुभवायला मिळतो. अनेक ठिकाणी कविता किंवा अभंग हे केवळ अलंकार म्हणून आलेले नसून त्या त्या कलेचा आशय अधिक प्रभावीपणे व्यक्त करण्याचे माध्यम ठरतात. यामुळे पुस्तकाची वाचनीयता आणि भावस्पर्शिता दोन्ही वाढतात.

चौंसष्ट कलांचा विचार करताना लेखिकेने केवळ पारंपरिक अर्थ सांगितलेला नाही, तर त्या कलांचे मानवी जीवनातील महत्त्वही अधोरेखित केले आहे. कला ही जीवन अधिक सुंदर, सुसंस्कृत आणि संवेदनशील बनवते, हा मूलभूत संदेश संपूर्ण पुस्तकातून सातत्याने जाणवतो. त्यामुळे हे पुस्तक केवळ कला-वर्णनापुरते मर्यादित राहत नाही, तर भारतीय जीवनदृष्टीचे दर्शन घडवणारे पुस्तक बनते.

लेखिकेची भाषा ही या पुस्तकाची आणखी एक जमेची बाजू आहे. संस्कृतप्रचुर विषय असूनही भाषाशैली अवघड वाटत नाही. आवश्यक त्या ठिकाणी संस्कृत शब्दांचा योग्य वापर आणि त्याचवेळी प्रवाही मराठी अभिव्यक्ती यांचा समतोल राखला गेला आहे. त्यामुळे अभ्यासक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी आणि सामान्य वाचक अशा सर्व स्तरांवरील वाचकांना हे पुस्तक सहज समजू शकते.

या पुस्तकात भारतीय सांस्कृतिक वारशाबद्दलचा आदर, परंपरेचा अभिमान आणि आधुनिक वाचकाला त्या परंपरेची ओळख करून देण्याची तळमळ सातत्याने जाणवते. आजच्या पिढीला भारतीय कलासंपदेची नव्याने ओळख करून देण्यासाठी अशा प्रकारचे साहित्य अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः भारतीय ज्ञानपरंपरा (भारतीय नॉलेज सिस्टिम्स) या संदर्भात चौंसष्ट कलांचा विचार होत असताना हे पुस्तक अभ्यासकांसाठी उपयुक्त संदर्भग्रंथ ठरू शकते.

तथापि, पुस्तकाच्या रचनेविषयी एक विधायक सूचना करावीशी वाटते. पुस्तकात अनुक्रमणिकेचा समावेश नाही. चौंसष्ट कलांवर आधारित पुस्तकामध्ये प्रत्येक कलेचे शीर्षक आणि संबंधित पृष्ठक्रमांक असलेली अनुक्रमणिका असती, तर वाचकाला एखादी विशिष्ट कला शोधणे अधिक सोपे झाले असते. संशोधक, विद्यार्थी किंवा संदर्भासाठी पुस्तक वापरणाऱ्या वाचकांच्या दृष्टीने अनुक्रमणिका अत्यंत आवश्यक घटक आहे. पुढील आवृत्तीत याचा अवश्य समावेश व्हावा, अशी अपेक्षा आहे.




तसेच प्रत्येक कलेच्या संदर्भातील प्राचीन ग्रंथसंदर्भ किंवा संदर्भसूची दिल्यास पुस्तकाचे शैक्षणिक मूल्य आणखी वृद्धिंगत होईल.

एकूणच, कलाधिपती हे पुस्तक माहिती, साहित्य, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुरेख मिलाफ घडवणारे आहे. लेखिकेची अभ्यासपूर्ण दृष्टी, लालित्यपूर्ण अभिव्यक्ती, भारतीय संस्कृतीवरील प्रेम आणि विषयाचे संवेदनशील आकलन या सर्व गुणांमुळे हे पुस्तक वेगळेपणाने लक्ष वेधून घेते. चौंसष्ट कलांचा परिचय करून देतानाच त्या कलांमागील भारतीय जीवनदृष्टीचा अनुभव वाचकाला देण्यात हे पुस्तक यशस्वी ठरते.

मराठी साहित्यात भारतीय कलावैभवाचा असा सौंदर्यपूर्ण परिचय करून देणारी पुस्तके तुलनेने कमी आहेत. त्या दृष्टीने सौ. वैदेही गद्रे यांचे कलाधिपती हे पुस्तक केवळ वाचनीय नव्हे, तर संग्रहणीय आणि पुनःपुन्हा संदर्भासाठी हातात घ्यावे असे पुस्तक आहे. भारतीय संस्कृती, चौंसष्ट कला, साहित्य आणि भारतीय ज्ञानपरंपरेत रस असलेल्या प्रत्येक अभ्यासकाने, शिक्षकाने, विद्यार्थ्याने आणि रसिक वाचकाने या पुस्तकाचा लाभ घ्यावा, अशी मनापासून शिफारस करावीशी वाटते.

# नवा ट्रेंड, अपत्य नको

**ज्योतिर्मय साहित्य**

पुर्वीच्या काळी लग्न आणि त्यानंतर अपत्यप्राप्ती ही संसाराची एक अनिवार्य साखळी मानली जात होती. आधुनिक युगात तरुण जोडपी आपल्याला मूल नको हा निर्णय घेत आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनात एक नवीन ट्रेंड पहायला मिळत आहे. दोन व्यक्ती, दोन पगार, मुलांशिवाय सुखी आयुष्य यालाच लोक (डबल इन्कम नो किड्स) असे म्हणत आहेत. विशेषतः आजची जेन झी पिढी या ट्रेंडने कमालीची प्रभावित झाली आहे. भारतासारख्या देशात जिथे कुटुंबाचे महत्त्व आणि मुलांचं संगोपन हा जीवनाचा अविभाज्य भाग समजला जातो, तिथे तरुणांमध्ये इतका मोठा बदल कसा आला आहे? या नवीन बदलामागे मुख्य सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणे आहेत.

**अफाट महागाई –**

आजकाल मुलांचे संगोपन, उत्तम शाळेची फी, आरोग्य व उच्च शिक्षण अत्यंत महाग झाले आहे. आर्थिकदृष्ट्या कुटुंब सक्षम नसल्यास मुलं नको असा विचार तरुण करत आहेत.

**करिअरवर पूर्ण लक्ष**

आजची स्त्री आणि पुरुष दोघांनाही आपल्या करिअरमध्ये सर्वोच्च शिखर गाठायचे असते. मुलं झाल्यास करिअरमध्ये खंड पडू शकतो किंवा



तडजोड करावी लागते. जी अनेक तरुणांना नको असते.

**जीवनशैली व स्वातंत्र्याची आवड**


मुलांच्या जन्मानंतर पालकांचे स्वतःचे आयुष्य, छंद, मित्र-मैत्रिणी आणि प्रवासाच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने येतात. स्वतःसाठी जगण्याला तरुण पिढी जास्त महत्त्व देत आहे. भविष्याची अनिश्चितता वाढते प्रदूषण, जागतिक तापमान वाढ, संशोधनाची कमतरता आणि युध्दजन्य परिस्थिती यामुळे मूल जन्माला आणून आपण त्याच्यावर अन्याय तर करत नाही ना असा विचार तरुण पिढी करताना दिसते.

**जबाबदारीची भीती–**

काही तरुण मुला मुलींना पालकत्वाची भीती असते. मूल वाढवणे ही २४ तास असणारी आयुष्यभराची जबाबदारी असते. या मोठ्या जबाबदारीसाठी आपण मानसिकदृष्ट्या तयार नाही, असे अनेकांना वाटते.

**विभक्त कुटुंब पध्दती पूर्वी एकत्र**

कुटुंबात मुल सांभाळायला आजी-आजोबा असायचे. आता पती-पत्नी दोघेच असल्यामुळे बाळाला सांभाळण्यासाठी कुणी आधार नाही या भावनेपोटी अपत्याची जबाबदारी नवीन पिढी घेत नाही. या निर्णयाचे संभाव्य तोटे व आव्हाने देखील आहेत.




**तरुण भविष्यातील एकलकोंडेपणा**

वयात स्वातंत्र्य चांगले वाटू शकते पण वाढत्या वयासोबत किंवा म्हातारपणी घरात एकटेपणा जाणवू शकतो. भावनिक आधाराची कमतरता आयुष्याच्या उत्तरार्धात एकटेपण किंवा आजारपणात काळजी घेणारे आणि भावनिक आधार देणारे हक्काचे माणूस नसल्याची उणीव असू शकते. सामाजिक दबाव व टीका समाजात अजूनही लग्न झाल्यावर मूल होणे नैसर्गिक मानले जाते. त्यामुळे अशा जोडप्यांना नातेवाईक आणि समाजाकडून सतत टोमणे किंवा मानसिक दबावाचा सामना करावा लागतो. जर बहुतांश तरुणांनी मूल नको हा निर्णय घेतला तर देशातील तरुणांची संख्या कमी होवून कुटुंब व्यवस्थेवर ताण येईल. याचा कुटुंब पध्दतीवर परिणाम होवून रक्ताची नाती कमी होतील. जेन झींचा अपत्य न होवू देण्याचा निर्णय वैयक्तिक पातळीवर फायदेशीर व सोयीचा वाटला तरी दूरगामी विचार करता त्याचे सामाजिक आणि कौटुंबिक स्तरावर दीर्घकालीन परिणाम होवू शकतात. कोणताही निर्णय विचारपूर्वक घेणे महत्त्वाचे ठरते कारण एक चुकीच निर्णय तुमच्या जीवनाची दिशा बदलू शकतो.

***



# सर्जा-राजाचा पोळा अन् पावसाचा कानाडोळा !

## जड अंत:करणाने सण कोरडा-कोरडाच साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - लाडक्या सर्जा -राजाचा पोळा सण बळीराजाने गुरुवारी, १० सप्टेंबर रोजी जड अं:तकरणाने कोरडा-कोरडाच साजरा केला. बहुतांश भागांत अद्याप पुरेसा पाऊस न झाल्याने खरीप पीक वाया गेले आहे. रब्बीचीही आशा मावळली आहे. या पार्श्वभूमीवर श्रावणी बैलपोळा दुष्काळाच्या गडद सावटात कसाबसा साधेपणाने साजरा झाला.

**भीषण स्थिती**

बुधवारी खांदेमाळणी होती. या दिवशी देखील शेत-शिवारांत ओढे, नदी-तलावांत कुठे थेंबभरही पाणी नसल्यामुळे घरातूनच बादलीने पाणी ओतून सर्जा-राजाला आंघोळ घालावी लागली. शेतात खरिपाची पिके जोमात नसल्यामुळे बळीराजा कोमात गेल्यागत भीषण स्थिती आहे, त्यामुळे पोळ्याच्या बाजारातही सगळीकडे निरुत्साह आणि शुकशुकाट दिसून आला.

शेतकऱ्यांसाठी वर्षभरातील सणांमध्ये श्रावणी पोळा हा महत्त्वाचा सण मानला जातो. यंदा मात्र कोणताही बडेजाव न करता साधेपणानेच सर्जा-राजाला सजवून गावाच्या पंचक्रोशीतून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. ग्रामदैवतांच्या मंदिरांना प्रदक्षिणा घालून घरा-घरांसमोर सर्जा -राजाची सुवासिनींनी पुरणपोळी नैवेद्य भरून मनोभावे पूजन केले. पूर्वीसारखे मारुती मंदिरांसमोरील वेशीतून मोठ्या प्रमाणावरील जल्लोषात वाजत-गाजत मानाचा बैल पुढे काढण्याची प्रथा हल्ली बंद पडल्यात जमा आहे. त्यामुळे होणारे भांडण-तंटे मिटविण्यासाठी कुठे पोलिसांचा बंदोबस्तही दिसून आला नाही. दुष्काळाचे भीषण सावट असल्यामुळे गावोगावी अगदीच साधेपणाने पारंपरिक पोळासण साजरा करण्यात आला. पीक-पाण्याची स्थिती चांगली असल्यास पोळा सणाचा उत्साह गगनात मावेनासा होतो. पोळा आणि पाऊस झाला भोळा, ही म्हण यंदा खोटी ठरली असून, पोळा आणि पावसाचा कानाडोळा, अशी परिस्थिती यंदा उद्भवल्याने पोळा सणाचा उत्साह फारसा कोठे जाणवलाच नाही. सव्वा महिन्यापासून पाऊस गायब झाल्याने कपाशी, तूर, सोयाबीन, मूग, उडीद आदी पिके पूर्णत: करपली आहेत. सुमारे ७५ टक्के खरिपाचे पीक वाया गेल्याचे प्रगतशील शेतकरी वसंत जगताप, विष्णू कळसकर यांनी सांगितले.

**चिंताजनक स्थिती**

बहुतांश भागात पावसाच्या दीर्घ खंडामुळे जमिनीतील ओलावा संपला असून, ऊस, कपाशी, तूर आदी पिकांवर विविध प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. पिके उत्पादनाच्या निर्णायक टप्प्यात असतानाच पावसाने ओढ दिल्याने चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. हल्ली शेतीचे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाल्याने बैलांच्या संख्येतही कमालीची घट झाली आहे. आठ-दहा बैलाची शेती असणाऱ्यांकडे अवघी एक बैलजोडी उरली आहे. काही गोरगरीब शेतकऱ्यांकडेही बैल असल्यामुळे त्यांनी आपापल्या कृतीप्रमाणे पोळासन साजरा करून आपल्या सर्जा-राजांप्रति असलेली कृतज्ञता व्यक्त केली, असे पैठण तालुक्यातील लोहगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रावसाहेब बोरुडे-पाटील यांनी सांगितले.

बैलांच्या सजावटीसाठी रंग, गोंडे, झूल, वेसण आणि घुंगरमाळांनी दुकाने सजली. मात्र, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे खरेदीचा उत्साह कमी होता, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. असल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक गणितही बिघडले आहे. त्यामुळे यंदा बहुतांश शेतकऱ्यांनी जुनाच साज सर्जा- राजाच्या अंगावर चढवून पोळासण साजरा केला.

बळीराजांनी आपल्या लाडक्या बैलांची वेगवेगळी नावे पाठीवर लिहून त्याला रंगवले होते. शिंगांना फुगे बांधून अंगावर झूल पांघरली होती. ''शिंगे रंगविली...बाशिंगे बांधिली, चढविल्या झुली ऐनेदार...''असा सारा थाट दुष्काळात का होईना पाहायला मिळाला. नंद्या-महाद्या, ढवळ्या-पवळ्या, धुळ्या-चपळ्या, हिरो, दुशिंग्या, लक्ष्या-चिक्शा आदी नावे पाठिंवर लिहिल्याचे दिसून आले. दुष्काळाचे सावट असेनाका, मात्र आपल्या सर्जा-राजाप्रति असलेली बळीराजाची बांधिलकी पोळा सणाच्या दिवशी दिसून आली, एवढे मात्र निश्चित!



राज्यस्तरीय पुरस्कारासाठी साहित्यिकांना आवाहन

**राज्यस्तरीय बांधिलकी मराठी साहित्य पुरस्कार २०२७**

मराठी साहित्याच्या विविध साहित्य प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी, गुणवंत साहित्यिकांच्या सर्जनशीलतेचा सन्मान करण्यासाठी बांधिलकी प्रतिष्ठान, अमरावती यांच्या वतीने "राज्यस्तरीय बांधिलकी मराठी साहित्य पुरस्कार -२०२७" साठी जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

राज्यातील साहित्यिकांनी दि. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या आपल्या साहित्यकृती पुरस्कारासाठी पाठवाव्यात.

■ पुरस्काराचे स्वरूप : प्रत्येक राज्यस्तरीय पुरस्कारासाठी : ₹११००/- रोख रक्कम, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल.

राज्यस्तरीय पुरस्कार : १. बांधिलकी कादंबरी पुरस्कार

■ प्रायोजक - वृषाली वानखडे २. बांधिलकी बालसाहित्य पुरस्कार, प्रायोजक - श्री. प्रफुल्ल ठाकरे. ३. बांधिलकी कथासंग्रह पुरस्कार

प्रायोजक - श्री. शंकर घोरसे. ४. बांधिलकी कवितासंग्रह पुरस्कार (वऱ्हाडी, गझल सर्व कवितेचे प्रकार) प्रायोजक - श्री. दिवाकर देशमुख

५. बांधिलकी समीक्षासंग्रह पुरस्कार प्रायोजक - सौ. स्मितताई बूल ६. बांधिलकी ललित लेखसंग्रह पुरस्कार प्रायोजक - शालिनी बेलसरे.

■ जिल्हास्तरीय साहित्य पुरस्कार : या पुरस्कारासाठी विविध साहित्यप्रकारांतील एकूण १० उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करण्यात येईल.

यासाठी सर्व साहित्यप्रकारांतील प्रकाशित साहित्यकृती मागविण्यात येत आहेत.

■ पुरस्काराचे स्वरूप : सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल प्रायोजक : मंदा नांदूरकर, छाया राऊत बर्वे, शारदा बरडे

■ साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख : दि. २० नोव्हेंबर २०२६. दि. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या साहित्यकृतींच्या दोन प्रती पाठवाव्यात. साहित्यकृतीसोबत लेखकाचा अलीकडील फोटो व अल्पपरिचय पाठविणे आवश्यक आहे.

■ साहित्य पाठविण्याचा पत्ता - ॲड. नीता प्रफुल्ल कचवे, नंदनवन कॉलनी, अमरावती पोस्ट - व्ही.एम.व्ही. - ४४४६०४ ता. व जि. अमरावती, महाराष्ट्र

■ संपर्क : ८८०५२५८०१६

■ विशेष सूचना : पुरस्कारासाठी साहित्य कृतीची निवड झाल्यास आपणास तसे निवड पत्राद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. याबाबतीत कुणीही संस्थेकडे वारंवार विचारणा करु नये..

पुरस्कारासंदर्भात कोणतीही अडचण अथवा अधिक माहिती साठी संपर्क साधावा.



पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग - ६)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

**पुराणांची विश्वकल्पना आणि भारतीय गणितीय खगोलशास्त्र**

पूर्वार्ध.....

विष्णुपुराणातील विश्वरचना आणि ग्रह-नक्षत्रांची अंतरे पाहिल्यानंतर एक प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो, हीच का प्राचीन भारताची खगोलशास्त्रीय परंपरा? याचे उत्तर देताना 'पुराणे' आणि 'गणितीय खगोलशास्त्र' या दोन मधील भेद स्पष्ट करणे आवश्यक आहे. पुराणांमध्ये विश्वाची निर्मिती, सृष्टीचक्र, लोकांची रचना, देवता, नक्षत्रे, ग्रह, कालखंड आणि विश्वातील विविध स्तर यांचे वर्णन प्रामुख्याने धार्मिक, तात्त्विक आणि सांस्कृतिक चौकटीत केले जाते. त्याउलट भारतीय गणितीय खगोलशास्त्राने आकाशीय घटनांचे निरीक्षण, मापन, गणना आणि भविष्यवाणी यांना अधिक महत्त्व दिले. या गणितीय परंपरेचा विकास अचानक झालेला नाही. वेदांग ज्योतिषापासून पुढे सूर्यसिद्धान्त, आर्यभटीय, ब्रह्मस्फुटसिद्धान्त आणि सिद्धान्तशिरोमणी यांसारख्या ग्रंथांमध्ये खगोलगणित अधिकाधिक विकसित होत गेले.

वेदांग ज्योतिष : कालगणनेची सुरुवात

वेदांग ज्योतिषाचा मुख्य उद्देश आधुनिक अर्थाने ग्रहभौतिकी मांडणे हा नव्हता. यज्ञ-विधींसाठी योग्य काल निश्चित करणे, तिथी, नक्षत्र, ऋतू आणि कालखंड यांची गणना करणे हा त्याचा प्रमुख हेतू होता. यातून एक मूलभूत गोष्ट स्पष्ट होते. आकाशाचे निरीक्षण हे प्राचीन भारतीय जीवनात प्रत्यक्ष उपयोगाशी जोडलेले होते.

■ सूर्यसिद्धान्त : गणितीय खगोलशास्त्राची विकसित परंपरा

पुढील काळात भारतीय खगोलशास्त्र अधिक गणितीय स्वरूप धारण करते. सूर्यसिद्धान्तात ग्रहांची स्थिती, कालगणना, ग्रहणविषयक गणना, दिवस-रात्र, त्रिकोणमितीय गणना आणि विविध खगोलीय परिमाणांचा विचार केला जातो. येथे आपण पुराणांतील विश्वकल्पनेपेक्षा वेगळी ज्ञानपद्धती पाहतो. आकाशीय वस्तू कुठे आहेत, त्या कोणत्या वेगाने फिरतात किंवा एखादी खगोलीय घटना कधी घडेल, यासाठी गणिती पद्धती वापरण्याचा प्रयत्न येथे दिसतो.

आर्यभट : निरीक्षण, गणित आणि स्वतंत्र विचार

आर्यभटाच्या आर्यभटीय ग्रंथाने भारतीय खगोलगणिताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान मिळवले. आर्यभटाने पृथ्वीच्या अक्षाभोवतीच्या भ्रमणाची कल्पना मांडली आणि आकाशातील दैनंदिन गतीचे स्पष्टीकरण पृथ्वीच्या फिरण्याशी जोडले. ग्रहणांचे स्पष्टीकरणही त्याने छाया आणि खगोलीय भूमितीच्या आधारे केले. ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कारण यावरून असे दिसते की, भारतीय खगोलपरंपरेत केवळ पुराणकथात्मक विश्वकल्पना नव्हती; त्याचबरोबर गणित आणि निरीक्षणावर आधारित स्वतंत्र खगोलविचाराची परंपराही विकसित झाली होती. यावरून मला असे वाटते कि आर्यभट हा वैज्ञानिक होता.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# ॥ज्योतिर्मय॥ दीपावली - 2026

## आनंदाचे डोही आनंद तरंग....

**प्रकाशन**
**20 ऑक्टोबर 2026**
विजया दशमी च्या मुहुर्तावर

दीपावली हिंदू मनामनातील सर्वात मोठा सण. दीपावली म्हणजे सर्वत्र आनंदी आनंद गडे, दीपावली हा असा सण आहे की लहान थोरापासून ते आजोबा आज्जी पर्यत सर्वच आनंदाने उजळून निघतात. सर्वत्र प्रसन्न वातावरण, फराळाची रेलचेल, नवीन कपडे, नवीन खरेदी, नवीन प्रकल्प, नवीन योजना, नवे मित्र-मैत्रिणी, सुट्टीची धमाल, आणि वाचनीय दिवाळी अंक हे अनेक वर्षापासून चालत आलेलं न बदललेलं एक सुखाचं समीकरण.

बदलत्या आधुनिकीकरणाने खूप साऱ्या गोष्टी बदलत आहेत, बद्दलले आहेत पण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो सर्व भारतीय संपूर्ण जगात अतिशय उत्साहात साजरा करतात.

दिवाळी आणि दिवाळी अंक हे समीकरण शेकडो. वर्षापासून चालत आलेलं आहे आणि ते अखंड चाल्तं राहणार, कारण दिवाळी अंकाशिवाय दिवाळी अधुरी आहे.

**"ज्योतिर्मय दीपावळी"** या नावातच सर्व काही सामावलेलं आहे, साहित्यांनी नटलेला संपूर्ण कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी या अंकात खूप काही असणार आहे.

त्यासाठी **ज्योतिर्मय साहित्य**च्या सर्व साहित्यिकांना आवाहन आहे की ज्यांनी त्यांचे दर्जेदार साहित्य **15 सप्टेंबर 2026 पर्यत** - **sanjayvyapari@gmaii.com** या ई-मेल आयडीवर किंवा **7743818559** या व्हाट्सअप वर पाठवावे.

- तुमच्या साहित्यावर "ज्योतिर्मय दीपावली" करिता लेख, किंवा कविता अशा स्पष्ट उल्लेख करावा.
- प्रत्येक साहित्यिक एक आर्टिकल व एक कविता पाठवू शकतो किंवा फक्त दोन कविता पाठवू शकतो.
- साहित्यावर लेखकाचा संपूर्ण पत्ता, पिनकोडसह असणे आवश्यक आहे.

## दिवाळी अंकासाठी विषय

**1. मोबाईलचा अतिरेक**
(उप विषय)
1. मोबाईलचा लहान मुलांवर होणारा परिणाम
2. मोबाईलचा तरुण वर्गावर होणारा परिणाम
3. स्क्रीन टाईम किती असावा
4. वाहनात किंवा वाहनावर मोबाईल वापरणे धोक्याचे.
5. मोबाईलमुळे एकटेपणा वाढला.
6. मोबाईल संदर्भात कोणताही विषय

**2. भारतीय सण**
(उप विषय)
1. भारतीय सण आणि त्यामागील भूमिका
2. सण - माणसांना जोडणारा दुवा
3. मंदिरे आणि व्यवसायीकरण

**3. माझे आठवणीतील पर्यटन**

**4. A I प्रणाली - फायदे / तोटे**

**5. देव माणसातच आहे**

**6. शाळेतील आठवणी**

**7. आज्जी आजोबांच्या गोष्टी हरवल्या**

**8. संस्काराचे महत्व**

**9. बाल साहित्य**

**10. इतर कोणताही सकारात्मक विषय**

**दिवाळी अंक प्रकाशनापूर्वीच पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.**
एका अंकासाठी ₹.500
व त्यापेक्षा जास्त अंकासाठी पुढील प्रत्येक अंकासाठी + ₹300 रुपये पडतील.
दिवाळी अंकाचे पेमेंट 100 टक्के ॲडव्हान्स लागेल.

**पेमेंट पाठवण्याची माहिती**
ज्योतिर्मय प्रकाशन
ऑनलाईन फोन पे नंबर
पे 7743818559
या नंबरवर पाठवावे व पेमेंट पाठवल्याचा स्क्रीनशॉट त्याच व्हाट्सअप नंबरवर पाठवावा.

**सर्वांना लेखनासाठी खूपखूप शुभेच्छा!**

- संपादक,
**ज्योतिर्मय दीपावली**
पुणे | छ. संभाजीनगर
मो. 7743918559, 7743818559

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559